जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
पुढारी

# आविष्कार संशोधन स्पर्धेत नवकल्पनांचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शेतीला लागणारी सहजसोपी ठिबक सिंचन पद्धत, घरगुती वापरासाठी उपकरण तसेच दिव्यांगांसाठी संवाद साधणारे हँडग्लोज अशा नवकल्पनांचे सादरीकरण शिवाजी विद्यापीठात मध्यवर्ती आविष्कार संशोधन स्पर्धेच्या निमित्ताने मंगळवारी विद्यार्थ्यांनी केले. स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम लोककला केंद्रात झाला. सहा गटांतर्गत झालेल्या या स्पर्धेत ३६ स्पर्धक सहभागी होते.

आविष्कार स्पर्धेत वारणानगरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रियंका पाटील हिने 'मराठा क्रांती मोर्चा : एक अभ्यास' हा प्रकल्प सादर केला. न्यू कॉलेजच्या सुरभी जाधवने 'शैक्षणिक तणावाचे व्यवस्थापन' या विषयावर सादरीकरण केले. संजय घोडावत इन्स्टिट्यूटच्या मुकेश काबरा याने ठिबक सिंचनाचे संशोधन स्पष्ट केले. नागठाणेच्या आर्टस अँड कॉमर्स कॉलेजच्या माधुरी देशमुख हिने तारळे परिसरातील कातकरी समाजाच्या शैक्षणिक स्थितीची मांडणी केली. यासह पाटण (सातारा) येथील बाळासाहेब देसाई कॉलेजच्या प्रगती यादव हिने राजकीय जाणिवेबाबत सादरीकरण तर 'डिफम्युट अल्टीमेटम' ही दिव्यांगांना उपयुक्त ठरणारी संकल्पना इस्लामपूरच्या आरआयटी



शिवाजी विद्यापीठातून

कॉलेजच्या श्रेया काळगावे, निखिल पाटील, शुभम मोटे यांनी मांडली. विद्यार्थ्यांनी अतिशय सोपे आणि साध्या पद्धतीने नवसंशोधनाच्या उपयुक्त संकल्पनांची मांडणी केली. यावेळी भीत्तिपत्रके पाहण्यासाठी गर्दी झाली होती. समारोप अभियांत्रिकी विद्याशाखेचे समन्वयक डॉ. एम. एच. सावंत, जे. पी. जाधव यांच्या उपस्थितीत झाला. संयोजन यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आविष्कार स्पर्धेचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

11 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**'आविष्कार' मध्यवर्ती संशोधन स्पर्धा : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून नवकल्पनांचे सादरीकरण**

# स्वयंचलित सिंचन, बोलणारा हँडग्लोज

कोल्हापूर : स्वयंचलित ठिबक सिंचन व्यवस्था, दिव्यांगांना (मूकबधिर) उपयुक्त ठरणारा बोलणारा हँडग्लोज, अशा स्वरुपातील नवकल्पनांचे सादरीकरण विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन स्पर्धेत मांडल्या.

विद्यापीठ पातळीवरील मध्यवर्ती आविष्कार संशोधन स्पर्धेचे उद्घाटन सकाळी अकरा वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. लोककला केंद्रातील या कार्यक्रमास बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आविष्कारचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. स्पर्धेत सहा गटांतर्गत मानव्यशास्त्र, भाषा, कला, शिक्षण, वाणिज्य, व्यवस्थापन, विधी, शुद्धशास्त्र, कृषी, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषध निर्माणशास्त्र, आदी विद्याशाखांमधून स्पर्धा झाली. त्यात ३६ स्पर्धक सहभागी झाले होते.

आदित्य वेल्हाळ



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आविष्कार मध्यवर्ती संशोधन स्पर्धेत इस्लामपूरच्या आरआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी उपयुक्त ठरणाऱ्या 'डीफ म्युट अल्टिमेट' ही संकल्पना सादर केली.

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ४२ जणांची निवड

या स्पर्धेत विजयी झालेले पदवीस्तरीय १२ विद्यार्थी आणि पदव्युत्तर, पदव्युत्तर शिक्षक विभागातून ३६ अशा एकूण ४८ स्पर्धकांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नांदेड येथील स्वामी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २७ ते २९ जानेवारीदरम्यान स्पर्धा होणार आहे.

वारणानगरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रियांका पाटील हिने 'मराठा क्रांती मोर्चा-एक अभ्यास' हा प्रकल्प सादर केला. न्यू कॉलेजमधील सुरभी जाधव हिने 'शैक्षणिक तणाव व्यवस्थापन', तर नागठाणेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजच्या माधुरी देशमुख हिने 'तारळे भागातील कातकरी समाजाच्या शैक्षणिक मागासलेपणाची मीमांसा' आणि पाटणच्या बाळासाहेब देसाई कॉलेजच्या प्रगती यादव हिने 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील राजकीय जाणीव' हे प्रकल्प सादर केले. इस्लामपूरच्या आरआयटी कॉलेजच्या रोहन कणसे, श्रेया काळगांवे, निखील पाटील व शुभम मोटे यांनी 'डिफ म्यूट अल्टिमेट' हा दिव्यांग (मूकबधिर) व्यक्तींना उपयुक्त ठरणारा बोलणाऱ्या हँडग्लोजचे संशोधन मांडले. संजय घोडावत इन्स्टिट्यूटच्या मुकेश काबरा याने स्वयंचलित स्प्रिंकलर ठिबक सिंचन व्यवस्था, तर विट्यातील बळवंत महाविद्यालयाच्या हृषीकेश महाडिकने सौरऊर्जेवर चालणाऱ्या सिंचन व्यवस्थेची कल्पना मांडली. दरम्यान, या स्पर्धेचा समारोप आभियांत्रिकी विद्याशाखेचे समन्वयक डॉ. एस. एच. सावंत, जे. पी. जाधव यांच्या उपस्थितीत झाला. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठात आविष्कार महोत्सव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांतून निवड झालेल्या पदवी स्तरीय विद्यार्थ्यांची विद्यापीठ पातळीवरील आविष्कार मध्यवर्ती संशोधन स्पर्धा गुरुवारी येथील लोककला केंद्रात उत्साहात पार पडली. स्पर्धेत ३६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी स्पर्धेचे उद्घाटन झाले. 'विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी अशा संशोधन स्पर्धा महत्वाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. शिंदे यांनी केले.'

यावेळी बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आविष्कारचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते. स्पर्धेत विजयी झालेले १२ पदवीस्तरीय विद्यार्थी व पदव्युत्तर, पदव्युत्तरोत्तर शिक्षक विभागातून ३६ असे एकूण ४८ स्पर्धक नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २७ ते २९ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होतील.

दरम्यान, आजच्या समारोप समारंभ अभियांत्रिकी विद्याशाखेचे समन्वयक डॉ. एस. एच. सावंत, प्रा. डॉ. जे. पी. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाने या मध्यवर्ती आविष्कार समारंभाचे यजमानपद भूषविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतून निवड झालेल्या पदवीस्तरीय विद्यार्थ्यांची विद्यापीठ पातळीवरील. आविष्कार मध्यवर्ती संशोधन स्पर्धा विद्यापीठातील लोककला केंद्रात उत्साहात पार पडली. यामध्ये ३६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी या संशोधन स्पर्धा महत्त्वाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले. यावेळी बीसीयूडीचे संचालक डी. आर. मोरे, उच्च शिक्षण सहसंचालक अजय साळी, कुलसचिव विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आविष्कारचे समन्वयक ए. एम. गुरव आदी उपस्थित होते. स्पर्धेचा समारोप समारंभ अभियांत्रिकी विद्याशाखेचे समन्वयक एस. एच. सावंत, जे. पी. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2017

लोकमत

# हायफा विद्यापीठासोबत सामंजस्य करार शक्य

## संशोधन, विद्यार्थी विकास उपक्रम : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत मान्यता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हे इस्रायलमधील हायफा विद्यापीठासमवेत संशोधन व विद्यार्थी विकास उपक्रम राबविणार आहे. सामंजस्य करार करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंगळवारी मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ कार्यालयात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. गेल्या दीड महिन्यापूर्वी संयुक्त संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि इस्रायलमधील एरियल विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला. कराराची प्रक्रिया नवी दिल्लीमध्ये झाली. यावेळी इस्रायलमधील तेल अवीव विद्यापीठ, हायफा व बार-ईलान, आदी विद्यापीठांच्या अध्यक्षांनी शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्यास उत्सुक असल्याचे सांगितले होते. त्यानुसार हायफा विद्यापीठासमवेत सामंजस्य करार केला जाणार आहे. त्याला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. पुण्यातील भारतीय शुगर या संस्थेसमवेत विद्यापीठाला सामंजस्य करार करण्यासदेखील मान्यता दिली आहे. अर्थशास्त्र विभागातर्फे 'अर्थव्यवस्थेची वाढ, गरिबी, असमानता आणि शाश्वत विकास' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली जाणार आहे. त्याला या बैठकीत मान्यता मिळाली आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2017

तरुण भारत

# विद्यापीठाचा हौफा युनिव्हर्सिटीशी सामंजस्य करारास मान्यता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि इस्रायल येथील हौफा युनिव्हर्सिटी यांच्यात सामंजस्य करार करण्यास मान्यता दिली. हा निर्णय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अर्थशास्त्र अधिविभागामार्फत 'इकॉनॉमिक ग्रोथ, पॉवर्टी, इनइक्विटी ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट" या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील भारतीय शुगर यांच्यात सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
पुढारी

# दोन सामंजस्य करारांना मान्यता

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या मंगळवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेत इस्त्रायलची हायफा युनिव्हर्सिटी आणि पुण्याच्या भारतीय शुगर संस्थेशी सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर सचिवपदी डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. अर्थशास्त्र विभागामार्फत अर्थव्यवस्थेची वाढ, गरिबी, असमानता, स्थावर विकास या विषयावर दोन दिवसीय आंतराष्ट्रीय परिषदेस मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
पुण्यनगरी

# इस्त्रायलच्या विद्यापीठाशी करार करण्यास मान्यता

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक मंगळवारी झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर सचिवपदी कुलसचीव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. यावेळी विविध विषयांवरील चर्चेअंती तीन महत्त्वाच्या विषयांना मान्यता देण्यात आली. यामध्ये इस्त्रायल येथील हायफा विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

अर्थशास्त्र अधिविभागामार्फत 'इकॉनॉमिक ग्रोथ, पॉवर्टी, अनइक्वेलिटी आणि सस्टेनिबल डेव्हलेपमेंट' या विषयावर दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर विद्यापीठ आणि भारतीय शुगर, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017

पुढारी

# 'प्रवासी हिंदी साहित्य और मानव' विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

## विद्यापीठात १२ व १३ रोजी आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे दि. १२ व १३ जानेवारी २०१७ या कालावधीत दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

'प्रवासी हिंदी साहित्य और मानव' या विषयावर हे चर्चासत्र होणार आहे. १९ व्या शतकापासून आजपर्यंत प्रवासी भारतीयांनी आपले प्रेम, एकाग्रता व निष्ठा या कारणांमुळे आपली वैश्विक ओळख निर्माण केली आहे. चर्चासत्रामध्ये 'प्रवासी हिंदी साहित्य, संकल्पना, प्रवासी हिंदी लेखनाची पार्श्वभूमी आणि स्वरूप या विषयावर चर्चा होईल. अमेरिका, कॅनडा, सुरिनाम, मॉरिशस, गयाना, त्रिनिदाद आणि टोबगो, फिजी येथील साहित्यिक, अभ्यासकांसह भारतातील केरळ, पश्चिम बंगाल, आसाम, गुजराथ, महाराष्ट्र इत्यादी विविध राज्यांतील साहित्यिक तसेच प्राध्यापक, संशोधक उपस्थित राहणार आहेत. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे वैशिष्ट्य म्हणजे या चर्चासत्राची सर्व प्रक्रिया अंकीय स्वरूपात (डिजिटल) राबविण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
सकाळ

## संक्षिप्त



### हिंदी विभागातर्फे उद्यापासून चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे गुरुवार (ता. १२) व शुक्रवारी (ता. १३) आंतरराष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. 'प्रवासी हिंदी साहित्य और मानव अधिकार' चर्चासत्राचा विषय आहे. चर्चासत्राची केंद्रीय संकल्पना, संशोधनाची सीमा व गुणवत्तेसाठी प्रवासी हिंदी साहित्य पर्यंतच मर्यादित ठेवली आहे. अमेरिका, कॅनडा, सूरीनाम, मॉरिशस, गुयाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, फिजी या देशांच्या तज्ज्ञांसह भारतातील केरळ, पश्चिम बंगाल, आसाम, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी विविध राज्यांतील साहित्यिक तसेच प्राध्यापक, संशोधक उपस्थित राहणार आहेत.

1 1 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# संविधानिक मूल्यांच्या आधारे लोकशाहीचे जतन आवश्यक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता, मानवता, परस्परांतील जिव्हाळा आणि नैतिकतेची देणगी भारतीयांना दिलेली आहे. या तत्वांच्या आधारे भारतीय लोकशाहीचे आपण जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी.आर. मोरे होते.

डॉ. भालेराव म्हणाले, भारतीय संविधान आणि समान संधी हा मानवतेवर आधारित



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना माजी प्राचार्य डॉ. हरिष भालेराव. सोबत डावीकडून डॉ. भगवान मान, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. प्रतिभा पाटणकर.**

विचार आहे. समान संधीच्या अनुषंगाने केंद्र–राज्य संबंध, जात, धर्म, वर्ग, पंथाच्या आधारे कोणताही विचार केला जात नाही. देशात कायद्याचे राज्य आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना समान संधी असली पाहिजे. संविधानाच्या कलम १४, कलम १६ आणि मार्गदर्शक तत्त्वांतील ४६ व्या कलमानुसार संविधानाने समान संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.

**माजी प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांचे प्रतिपादन**

याप्रसंगी एम. एड. ची प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी पल्लवी जोशी यांनी "मी सावित्रीबाई फुले बोलते" हा एकपात्री प्रयोग सादर केला. समान संधी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी कक्षाविषयी माहिती दिली. तर आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जगन कराडे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी प्रास्ताविक केले. विधी विभागाचे प्रभारी विभागप्रमुख व्ही. वाय. धुपदाळे यांनी आभार मानले. अविनाश वर्धन यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने वि. स. खांडेकर व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अनंत व डॉ. श्रीमती लाभसेटवार प्रतिष्ठान यांच्यातर्फे वि.स. खांडेकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. सोमवार १६ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये डॉ. अविनाश सप्रे 'वि. स. खांडेकर यांची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. सुरेश गवळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, तर डॉ. अनंत लाभसेटवार प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती संयोजन समितीने पत्रकाद्वारे दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'डॉ. पवारांमुळे शिक्षणात क्रांती'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आयुष्यभर एक कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक प्रशासक म्हणून भूमिका बजावली. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाज शिक्षणात अग्रेसर राहिला. महाराष्ट्रातील शिक्षणक्रांती डॉ. पवारांमुळेच झाली, असे प्रतिपादन बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. 'कमवा व शिका' प्रबोधिनीतर्फे डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'महाराष्ट्रातील शिक्षणाची तळागाळापासून बांधणी करण्याचा व उत्तम उच्च शिक्षित नागरिक घडविण्याचा ध्यास डॉ. पवार यांनी घेतला होता. या ध्यासापोटी सलग १२ वर्षे विद्यापीठाचे नेतृत्व केले. विविध योजना अमलात आणताना 'कमवा व शिका' ही योजना भारतातील कोणत्याही विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्यांदा सुरू करण्यात आली. ही योजना विद्यापीठाची मानबिंदू ठरली आहे.'

कार्यक्रमात प्रबोधिनीचे संचालक डॉ. सी. टी. पवार यांनी १८ हजार रुपये देणगी जाहीर केली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. मानसिंग जगताप, प्रा. किसनराव कुराडे, प्रा. एम. टी. हजारे, प्रा. एन. डी. गुरव, डॉ. आर. एम. गुरव, के. वाय. चव्हाण उपस्थित होते. उपप्राचार्य टी. के. सरगर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. जे. नाईक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. टी. पवार यांनी आभार मानले.

11 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ संघाचा विजय

**कोल्हापूर** : भोपाळ (मध्य प्रदेश) येथील बरकतउल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाचा १-० अशा गोलने पराभव केला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात सुरुवातीपासून दोन्ही संघांनी शॉर्टपासिंगवर भर देत आक्रमणाची धार वाढविली. १६ व्या मिनिटाला मध्यरेषेच्या पुढे उजवीकडील बाजूने शिवाजी विद्यापीठ संघाचा बचावफळीतील साहिल निंबाळकरने चेंडूला टर्न करत लहान डीनध्ये चेंडू हृषिकेषच्या डोक्यावर टाकला. हृषिकेषने हेडच्या सहाय्याने चेंडूला अलगद गोलजाळ्याची दिशा दाखवत आघाडी मिळवून दिली.

उत्तरार्धात मुंबई संघाने आक्रमक खेळी केली. मुंबईच्या अशरफने डी बाहेरुन मारलेला चेंडू वृषभ ढेरेने गोलरेषेवरुन परतवला. गोल फेडण्यासाठी मुंबईने आटोकाट प्रयत्न केले पण शिवाजी विद्यापीठ संघाच्या बचावफळीतील कर्णधार अक्षय मेथे, ओंकार साळवी, साहिल व पवन माळी यांनी ते परतवून लावले. शिवाजी विद्यापीठ संघाने या सामन्यात विजय मिळविला. शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. एन. आर. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2017

सकाळ

पश्चिम विभागीय फुटबॉल

# शिवाजी विद्यापीठाची मुंबई विद्यापीठावर मात

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : भोपाळ (मध्यप्रदेश) येथील बरकत उल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत चुरशीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने बलाढ्य मुंबई विद्यापीठाचा १-० गोलने पराभव केला. हृषीकेश मेथे याने गोल केला.

सामन्याच्या १२ व्या मिनिटाला शिवाजीच्या सिद्धेश यादवने एक सोपी संधी दवडली. १६ व्या मिनिटाला मध्यरेषेच्या पुढे उजवीकडील बाजूने 'शिवाजी'च्या बचाव फळीतील साहिल निंबाळकरने चेंडूला टर्न करीत पेनल्टी क्षेत्रात चेंडू हृषीकेशच्या डोक्यावर टाकला. त्याने हेडच्या साहाय्याने चेंडूला अलगद गोलजाळ्याची दिशा दाखवत आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत ही आघाडी कायम राहिली. मध्यंतरानंतर मुंबईच्या अशरफने डी बाहेरून मारलेला चेंडू शिवाजी संघातील वृषभ ढेरेने गोल रेषेवरून परतवला. गोल फेडण्यासाठी मुंबईने आटोकाट प्रयत्न केले. पण, 'शिवाजी'च्या बचावफळीतील कर्णधार अक्षय मेथे, ओंकार साळवी, साहिल व पवन माळी यांनी हल्ले तितक्याच ताकदीने परतवून लावले. शेवटी 'शिवाजी'ने सामना १-० ने जिंकला.

शिवाजी विद्यापीठाचा स्पर्धेतील हा चौथा विजय असून यापूर्वी उदयपूर संघाविरोधात ५-१, सोलापूर ७-०, पुणे २-१ असे विजय मिळविले आहेत. शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. एन. आर. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून उद्या (ता. ११) सकाळी १० वाजता 'शिवाजी'चा पात्रता सामना जबलपूरविरुद्ध होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठाची मुंबई विद्यापीठावर मात

आंतरविद्यापीठ स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

भोपाळमधील स्पर्धेत यश

भोपाळ (मध्य प्रदेश) येथील बरकतउल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी चुरशीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने बलाढ्य मुंबई विद्यापीठाचा १-० असा पराभव केला. विजयी गोल ऋषिकेश मेथे-पाटीलने केला.

सामन्याच्या सुरवातीपासून दोन्ही संघानी शॉर्ट पासिंगवर भर देत आक्रमणाची धार वाढवली. सामन्याच्या १२ व्या मिनिटाला शिवाजी विद्यापीठाच्या सिद्धेश यादवने एक सोपी संधी दवडली. तर, १६ व्या मिनिटाला मध्यरेषेच्या पुढे उजवीकडील बाजूने शिवाजी विद्यापीठाच्या बचाव फळीतील साहिल निंबाळकरने लहान डीमध्ये चेंडू ऋषिकेशच्या डोक्यावर टाकला. ऋषिकेशने हेडच्या सहाय्याने चेंडूला अलगद गोलजाळ्याची दिशा देत आघाडी मिळवून दिली. सामन्यात मध्यंतरापर्यंत शिवाजी विद्यापीठ संघाची आघाडी कायम राहिली. मध्यंतरानंतर मुंबई संघाने आक्रमण वाढविले.

५५ व्या मिनिटाला मुंबईच्या अशरफने 'डी' बाहेरून मारलेला चेंडू वृषभ ढेरेने गोल रेषेवरून परतवला. गोल फेडण्यासाठी मुंबई विद्यापीठाने अटोकाट प्रयत्न केले. पण, शिवाजी विद्यापीठाच्या बचावफळीतील कर्णधार अक्षय मेथे-पाटील, ओंकार साळवी, साहिल व पवन माळी यांनी हल्ले तितक्याच ताकतीने परतवून लावले.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा हा चौथा विजय असून, यापूर्वी उदयपूर संघास ५-१, सोलापूर विद्यापीठावर ७-०, पुणे विद्यापीठावर २-१ असे विजय मिळविले आहेत. संघाला प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. एन आर कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. उद्या (बुधवार, ११ जानेवारी) सकाळी १० वाजता शिवाजी विद्यापीठाचा पात्रता फेरीतील सामना जबलपूर विद्यापीठाबरोबर होणार आहे.

11 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची मुंबई संघावर मात

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धा



**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

अटीतटीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने बलाढ्य मुंबई विद्यापीठाचा एकमेव गोलने पराभव करून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत आगेकूच केली. विजयी गोलची नोंद ऋषीकेश मेथे-पाटील याने केली.

भोपाळ (मध्य प्रदेश) येथील बरकत उल्ला विद्यापीठाच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचा सामना मुंबई विद्यापीठाविरोधात झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांकडून जलद व आक्रमक खेळ झाला. शॉर्ट पासिंगवर भर देत आघाडीसाठी चढाया करण्यात आल्या. शिवाजी विद्यापीठाने विशेष व्यूहरचना करत चढाया तीव्र केल्या. १२ व्या मिनिटाला सिद्धेश यादवची सोपी संधी हुकली. १६ व्या मिनिटाला सेंटरपासून नेलेला चेंडू शिवाजी विद्यापीठाचा बचावपटू साहिल निंबाळकर याने उजव्या बाजूने आघाडीच्या ऋषीकेश मेथे-पाटील यांच्या डोक्यावर टाकला. या संधीचा पुरेपूर फायदा उठवत ऋषीकेशने हेडद्वारे बिनचूक गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर शिवाजी विद्यापीठाने बचावात्मक खेळ करत गोलची परतफेड होऊ दिली नाही. बचावफळीत कर्णधार अक्षय मेथे-पाटील, ओंकार साळवी, साहिल व पवन माळी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने आपली विजयी घोडदौड अखंड राखत सलग चौथा विजय मिळविला आहे. यापूर्वीच्या सामन्यात उदयपूर विद्यापीठाचा ५-१ असा पराभव केला. सोलापूर संघाचा ७-० असा धुव्वा उडविला. पुणे विद्यापीठाचा २-१ असा पराभव केला, तर चौथ्या सामन्यात मुंबई विद्यापीठ संघाला एकमेव गोलने नमविले. बुधवारी शिवाजी विद्यापीठाचा पात्रता फेरीतील सामना सकाळी १० वाजता, जबलपूर विद्यापीठाविरोधात होणार आहे. संघाला प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. एन. आर. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.